| | | | |
|---|---|---|---|
| **MHBI060006772023** | सं. फौ. खटला क्र. | : | १७५/२०२३ |
| | राजाभाऊ वि. शरद व ईतर | | |
| | निशाणी क्रमांक | : | ३६ |

<u>**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ०२**</u>

**शपथेवर कथन करते/करतो की,**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **नाव** | **:** | अनिता राजाभाऊ सौदागर, | | | |
| **वय** | **:** | ४८ | वर्ष | **धंदा** | घरकाम, |
| **राहणार** | **:** | प्रशांत नगर, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. | | | |

**<u>सरतपास फिर्यादी तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. के. गोचडे यांचे मार्फत</u>**

घटना ही दिनांक ०४/०८/२०२२ रोजी संध्याकाळी ०७.०० वाजता माझे राहते घरी प्रशांत नगर येथे घडली होती. घटनेच्या वेळी माझे पती राजेभाऊ सौदागर हे दारामध्ये उभे होते व मी घरामध्ये काम करत होते. त्यावेळी शरद सौदागर, अंजु सौदागर, मधुकर राऊत व शोभा राऊत आले व माझे पतीशी बोलु लागले. आवाज ऐकुन मी घराच्या बाहेर आहे. त्यावेळी आरोपी शरद हे माझे पती राजेभाऊ यांना पहिल्या केस काढुन घे म्हणुन धमकी देत होते. तसेच शिवीगाळ करत होते. माझे पतीस शरद सौदागर यांनी गचीला धरुन खाली पाडले व ईतर तिघांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व शिवीगाळ केली. तेंव्हा मी सदरचे भांडण सोडवण्यासाठी गेले होते. त्यामध्ये मला देखील धक्काबुक्की झाली होती. तुझे हातपाय तोडुन तुला जिवे मारतो अशी सर्वांनी धमकी दिली होती. त्यानंतर मी माझे पतीस दवाखाण्यात घेऊन गेले. दुस-या दिवशी माझे पतीने पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दाखल केली. त्यानंतर दहा दिवसांनी पुन्हा शरद सौदागर हा माझे पतीला कितीही केस केल्यातरी मला फरक पडत नाही असे म्हणाला होता.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री बी. ए. पुरी यांच्या तर्फे</u>**

आरोपी शरद हे माझे दिर, अंजु जाऊ, शोभा ही नणंद व मधुकर हे शोभाचे पती आहेत. घटनेच्या वेळी आम्ही आमच्या घराच्या खालच्या मजल्यावर रहात होतो. हे

म्हणणे खरे नाही की, सन २०१८ मध्ये माझे पती राजेभाऊ यांनी आरोपी शरद, शोभा व माझे सासु-सास-याविरुध्द दिवाणी दावा क्र. १४६/२०१८ चा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१४ मध्ये माझे पती, आरोपी क्र. १ शरद व माझे सासु-सास-यांमध्ये घराच्या वाटण्या झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, घराच्या वाटण्या झाल्या असतानांही पुन्हा वाटण्या करा म्हणुन माझे पतीने २०१८ मध्ये दिवाणी दावा दाखल केला होता. आजमितीला माझे सास-यांना आम्हीच सांभाळत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सास-यांना सांभाळत नाही म्हणुन माझे सास-याने माझे पतीविरुध्द पोटगी मिळावी म्हणुन उपविभागीय न्यायदंडाधिकारी यांच्याकडे प्रकरण दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की,सदर खटल्यामध्ये आम्ही वरच्या मजल्यावर रहायला जावे व सास-यांनी खालच्या मजल्यावर रहावे असा आदेश झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर आदेशाविरुध्द माझे पतीने जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये अपिल दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की,सदर अपिलाविरुध्द माझे पतीने मा. ना. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली असुन, सदर याचिका अद्यापपावेतो प्रलंबीत आहे. आम्ही आताच्या श्रावण महिन्यामध्ये चतुर्थीला वरच्या मजल्यावर रहायला गेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही खाली रहात असतांना आम्ही खालच्या मजल्यावर किचनओटा बांधला होता. हे म्हणणे खरे नाही की,सदरचा किचनओटा पाडण्यासाठी आम्ही वर रहायला गेल्यानंतर सास-यांच्या घरी आम्ही काही लोकांना पाठवले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझे पतीने माझे सास-यांविरुध्द अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीने माझे सासु-सास-यांना मारहाण केल्याबाबत माझे सास-यांनी दिनांक १६/०२/२०२४ रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा क्र. ९२/२०२४ चा दाखल केला होता. त्याअनुषंगाने न्यायालयामध्ये खटला प्रलंबीत आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की,माझे पतीने सन २०१८ मध्ये दाखल केलेला दावा उचलुन घेतलेला आहे.

हे म्हणणे खरे आहे की,माझे घराचे समोर शाळा आहे. माझे घराच्या पुर्वेला फड, पश्चीमेस मोरे, दक्षिणेस नागरगोजे व उत्तरेस रस्ता आहे. मला मारहाण झाल्याबाबत मी दवाखाण्यामध्ये उपचार घेतले नव्हते. पतीला दवाखाण्यात घेऊन गेल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा आम्ही दाखल करु शकत नाहीत कारण पतीला आम्ही खाजगी दवाखाण्यामध्ये घेऊन गेलो होतो.

आरोपी शरद हे ग्रामसेवक, आरोपी मधुकर हे सेवानिवृत्त शिक्षक असुन आरोपी शोभा ही शिक्षीका आहे. हे म्हणणे खरे नाही की,आरोपींनी माझे पतीविरुध्द सन २०१८ व २०२१ मध्ये दाखल केलेल्या दाव्यांवर प्रभाव पाडण्यासाठी प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात नमुद अशी कोणतीही घटना घडलेली नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SAGADE PRAVIN PRABHAKAR
Date: 2025.11.03 11:06:36 +0530

दिनांक: ०१/११/२०२५
अंबाजोगाई

(**प्रविण प्र. सागडे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट नं.१)अंबाजोगाई, जि. बीड.